MHLA050012192009

**<u>लवाद प्रकरण नियमीत वसुली अर्ज क्र.१२७/२००९ मधील नि.क्र.३१०</u>**

**<u>खालील आदेश</u>**

**<u>[ उस्मानाबाद जनता सहकारी बँक, शाखा-अहमदपूर</u>**

**<u>..वि..</u>**

**<u>अविनाश माधवराव पाटील व इतर ]</u>**

सदरकामी दिनांक १७/०३/२०२५ रोजी जाबदार क्र.१, ३ ते ५ यांना दिवाणी तुरुंगात पाठविण्यासाठी निर्वाह भत्ता जमा करण्याविषयी आदेश झाला होता. मात्र तत्पुर्वी दि.प्र.सं.क्रम-२१ नियम-३७ अन्वये नोटीस काढण्यात आलेली नव्हती. मात्र त्या अर्जावर जाबदार यांनी म्हणणे द्यावे असा आदेश माझया पुर्व पिठासीन अधिका-यांनी केला होता. त्याबरहूकूम जाबदार क्र.४ आणि ५ यांनी नि.क्र.३१२ लगत आणि जाबदार क्र.१ ते ३ यांनी नि.क्र.३१३ लगत म्हणणे दिलेले आहे.

२. दि.प्र.सं.क्रम-२१ नियम-३७ अन्वये नोटीस काढण्याचा हेतु अशा प्रकारच्या अर्जावर जाबदारांचे म्हणणे घेणे हाच असतो. तांत्रीक बाब म्हणुन नोटीस काढलेली नाही असा बचाव जाबदार क्र.१, ३ ते ५ यांनी घेऊ नये म्हणुन सदर आदेश करण्यात येत आहे. या प्रकरणी पुर्व पिठासीन अधिका-यांनी दि.प्र.सं.क्रम-२१ नियम-३७ अन्वये नोटीस काढण्याचा आदेश केलेला नसला तरीही त्यामुळे तांत्रीक अडचण निर्माण होत नाही.

**स्वाक्षरीत/-**

**दिनांक:०३/०४/२०२५.** **[ एस.एन.सरडे ]**

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.